# युद्धप्रसंगी पवित्र पैगंबर (स.) यांचे आदर्श नमूने तसेच अत्याचारग्रस्त पॅलेस्टिन लोकांसाठी प्रार्थनेचे आग्रह

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. १-१२-२०२३ स्थान मशिद मुबारक,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहा नंतर हुजूर म्हणालेः आज मी पवित्र पैगंबर (स.) यांच्या युद्धांबद्दल स्पष्टीकरण देईन. पवित्र पैगंबरांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आणि पैगंबरांच्या आदर्श स्थितीबद्दल विस्तृत माहिती मिळते. बद्रच्या लढाईसंदर्भात, त्यांनी कैद्यांना कशा सुविधा दिल्या हे आपण पाहिले आहे. कैदी स्वतः सांगतात की पवित्र प्रेषितांच्या निर्देशानुसार, सोबती आम्हाला स्वतःच्या अन्नापेक्षा चांगले अन्न द्यायचे. नंतर त्यांनी (स.) या कैद्यांना अगदी सोप्या अटींवर सोडले.

काहींची खंडणी एवढीच होती की ज्यांना लिहिता-वाचता येते त्यांनी मुस्लिमांना लिहायला-वाचायला शिकवावे.

हे सर्व त्यांचे कोणाशीही वैयक्तिक वैर नव्हते, उलट अल्लाहचा धर्म नष्ट करणाऱ्यांविरुद्ध युद्ध सुरू होते. काही लोक त्यांच्या मजबुरीमुळे शत्रूमध्ये सामील झाले आणि त्यांना मुस्लिमांशी युद्ध करायचे नव्हते. त्यांना अनेक सुविधा दिल्या. त्यांच्यापैकी काही मुस्लिम देखील झाले. त्यांनी (स.) युद्धाची तत्त्वे आणि नियम स्थापित केले, करार केले आणि या गोष्टींचे टोकापर्यंत पालन केले. आजच्या जगासारखे नाही की अनेक नियम आणि कायदे केले गेले आहेत पण त्यानुसार कृती नाहीत तर दुटप्पी मानक आहेत.

त्यांचे जीवन पवित्र कुरआनच्या नियमांचे व्यावहारिक स्पष्टीकरण होते, जिथे न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्याच्या मूलभूत तत्त्वांचे वर्णन केले आहे. सर्वशक्तिमान अल्लाह एके ठिकाणी म्हणतात:

يَاَيُّهَا الَّذِيۡنَ اٰمَنُوۡا كُوۡنُوۡا قَوّٰمِيۡنَ لِلّٰهِ شُهَدَآءَ بِالۡقِسۡطِ ۖ وَلَا يَجۡرِمَنَّكُمۡ شَنَاٰنُ قَوۡمٍ عَلٰٓى اَلَّا

تَعۡدِلُوۡا ‌ؕ اِعۡدِلُوۡا ۚ هُوَ اَقۡرَبُ لِلتَّقۡوٰى ۖ وَاتَّقُوا اللّٰهَ ‌ؕ اِنَّ اللّٰهَ خَبِيۡرٌۢ بِمَا تَعۡمَلُوۡنَ

हे श्रद्धावंत लोकहो! तुम्ही न्यायपूर्वक साक्ष देत असताना, अल्लाहच्या कार्यात मन स्थिर करा, आणि लोकांचे वैमनस्य, न्यायपूर्वक असेल त्याव्यतिरिक्त अन्य कृत्य करण्यास तुम्हाला प्रवृत्त न करो, सदैव न्यायपूर्ण व्यवहार करा, ती गोष्ट सदाचरणाच्या निकटतम आहे, आणि अल्लाहचे भय बाळगा, तुम्ही जे काही करता ते अल्लाह निश्चितच जाणतो. म्हणून पैगंबराचा आदर्श याच शिकवणीवर आधारित होता.

आज मी उहूद बद्दल काही सांगणार आहे. ज्या घटनांवरून हे सिद्ध होते की, हे युद्ध देखील शत्रूने सुरु केले होते ज्यानंतर मुस्लिम देखील युद्धासाठी बाहेर पडले. हा युद्ध बदरच्या पुढच्या वर्षी तिसरा हिजरी मध्ये लढले गेले.

उहुद शव्वालची लढाई ३ हिजरीमध्ये झाली हे इतिहासकार आणि चरित्रकार सहमत आहेत.तथापि, चार हिजरी आणि अधिकत रसात आणि पंधरा शव्वाल असाही उल्लेख आहे.

पवित्र पैगंबर (स.) शुक्रवारी असर नमाज नंतर मदिना सोडले आणि शनिवारी सूर्योदयापूर्वी मैदान उहुद येथे पोहोचले.

ग्रंथ सिरत खातमुन्निबीय्यीन मध्ये हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब यांनी युद्धाचे दिवस शनिवारी १५ शव्वाल ३ हिजरी ३१ मार्च ६२४ असे नमूद केले.

या लढाईचे कारण असे की बद्रच्या युद्धात कुरैशांचा पराभव झाला तेव्हा कुरैशांचे काही प्रमुख लोक जसे की अब्दुल्ला बिन अबी रबीआ, इक्रामा बिन अबू जहल, सफवान बिन उमय्या आणि इतर काही नेते अबू सुफयानकडे आले, ज्यांचे साहित्य आणि संपत्ती जो बद्रच्या युद्धाला कारणीभूत होते. ही संपत्ती मक्केत आणून

दारूल-दहमध्ये ठेवण्यात आली. ते अबू सुफयानला म्हणाले की मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आमच्या लोकांना मारले आहे, त्यामुळे या व्यापाराने त्यांच्याशी युद्धाची तयारी करा, हे शक्य आहे की आम्ही आमच्या मारल्या गेलेल्यांचा बदला घेऊ शकतो आणि त्याने सांगितले की आम्हाला आनंद होईल की आम्ही या व्यापारातील नफ्यातून सैन्य तयार करू. त्यांचा हा प्रस्ताव मान्य झाला.

कुरैशने संपत्तीतून २५,००० नफा वेगळे केले आणि मूळ संपत्तीच्या मालकांना दिले.

या एका सामान्य कारणाशिवाय इतरही काही मुद्दे या युद्धाचे कारण मानले जाऊ शकतात. बद्रच्या आक्रमणानंतर मक्केच्या लोकांना सीरियाला जाणे अशक्य झाले कारण मक्केचा व्यापारी मार्ग उपनगरातून जात होता. मदीना आणि कुरैशांना त्यांच्या पूर्वीच्या घरांमध्ये परत जावे लागले. जुलूम आणि छळामुळे तेथून जाणे कठीण झाले होते. गझवत आणि सराया येथील पराभव, बद्रमधील कुरैश सरदारांची हत्या आणि अटक यांसारख्या बाबी. सत्तर विरोधकांची अटक अशा प्रकारचे प्रसंग त्यांच्या प्रतिष्ठेसाठी आणि सामाजिक स्थितीला कलंक होते. त्यांची प्रतिष्ठा परत मिळवण्यासाठी त्यांना सूड घ्यायचा होता. एका लेखकाने दिलेले एक कारण म्हणजे कुरैश काही मोहिमांमध्ये अयशस्वी झाले होते आणि त्यामुळे त्यांच्यात खूप दुःख आणि बदला होता. तथापि, इतर अनेक कारणांमुळे कुरैशांनी युद्धाची तयारी सुरू ठेवली. आजूबाजूच्या जमातींना एकत्र आणण्यासाठी तो काहींना लाच तर काहींना मानधन देऊन एकत्र आणले.

काफिरांच्या या तयारीची माहिती हजरत अब्बास यांच्या पत्राद्वारे पवित्र प्रेषितांना देण्यात आली होती. दुसरीकडे, यहूदी आणि दांभिक लोकांनी प्रसिद्ध केले की मोहम्मदला (स.) कोणतीही चांगली बातमी मिळाली नाही. त्यांनी या बातमीला पसरवून मुस्लिमांना घाबरवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे सर्वजण सावध झाले. एक गोंधळ माजला की श्रद्धाहीन मदिनेवर आक्रमण करण्यास येत आहेत.

रमजान ३ हिजरी च्या शेवटी किंवा शव्वालच्या सुरुवातीला कुरैशांच्या सैन्याने मक्का सोडला. सातशे सैनिक, दोनशे घोडे आणि तीन हजार उंटांसह त्यांची संख्या तीन हजार होती.

त्यांच्यासोबत अबू सुफियान, इक्रामा बिन अबू जहल, सफवान बिन उमाय्या, खालिद बिन वलीद आणि अमर बिन अल-आस यांच्या पत्नींसह पंधरा महिलाही होत्या.

हजरत अब्बास (रजि.) यांनी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांना कुरैशांच्या सैन्याविषयी माहिती दिली आणि अमर इब्ने सलीम यांनी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांना याबद्दल माहिती दिली. सफवान बिन उमय्याह म्हणाला की आमची संख्या जास्त आहे, आमची युद्धसामग्री जास्त आहे, आमच्याकडे त्यांच्या जीवाची आणि मालमत्तेची हानी करण्याची ताकद आहे, याउलट ते दुर्बळ आहेत.

अबू सुफयानची पत्नी हिंद म्हणाली की तुम्ही मुहम्मदच्या आईची कबर खोदून प्रत्येकाला त्याच्या आईचे एक अवयव खंडणी म्हणून द्या. अशा प्रकारे ते आमच्या मृतांच्या कबरी खोदतील असे सांगून कुरैश त्याच्याशी असहमत झाले. या सैन्यातील स्त्रिया सूड उगवत होत्या आणि हा ताफा पुढे जात होता. दुसरीकडे मुस्लिम तयारीला लागले होते.

सिरत खातमुन्निबीय्यीन मध्ये असे लिहिले आहे की पवित्र प्रेषित (स.) यांनी कुरैश सैन्याची खबर आणण्यासाठी दोन साथीदारांना पाठवले आणि या प्रसंगी त्यांनी (स.) मदीनाच्या संपूर्ण मुस्लिम लोकसंख्येची जनगणना केली. मुस्लिमांची संख्या आणि सामर्थ्य म्हणजे एकूण पंधराशे मुस्लिम आहेत.

त्यावेळेच्या परिस्थितीत ही संख्या मोठी मानली गेली. काही साथीदार आनंदाच्या भरात म्हणाले, ''अजूनही घाबरण्याचे काही कारण आहे का?''

जेव्हा उहूदच्या युद्धाच्या तयारीसाठी सल्लामसलत चालू होती, त्या वेळी पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) असे सांगितले की रात्री मला स्वप्न पडले की एक गाय कापली जात आहे आणि त्यांच्या तलवारीच्या धारेत, झुल्फिकार एक दात दिसला. इतर परंपरेत तलवारीचा धार तुटल्याचा उल्लेख आहे आणि टेकडीला तडा

गेला आहे.) मग मी पाहिले की मी माझा हात मजबूत चिलखतामध्ये ठेवत आहे. पैगंबर (स.) यांनी त्याचा असा अर्थ लावला की, गाईचा संबंध आहे, हे सूचित करते की माझे काही साथीदार शहीद होतील. आणि माझ्या तलवारीच्या तुटण्याबद्दल, हे एक संकेत आहे की माझे कुटुंब किंवा नातेवाईक त्यांच्यापैकी एक मारला जाईल. आणि मजबूत चिलखत म्हणजे मदीना आणि मेंढा म्हणजे शत्रूच्या समर्थकांना मारीन. तथापि, पवित्र प्रेषित (अल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या विषयावर सल्ला मागितला आणि म्हणाले, ''जर तुमचा मत असेल तर मदीनामध्ये रहा आणि आम्ही महिला आणि मुलांना किल्ल्यांवर पाठवू.'' मदिना हा किल्ल्यासारखा होता. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेले मत हे मुहाजिरीन आणि अन्सार यांचे मत होते. अर्थातच, बद्रच्या युद्धात सहभागी न झालेल्या आणि उत्सुक असलेल्या मुस्लिम तरुणांचा एक गट आणि हौतात्म्ये प्राप्त करण्याच्या उद्देशाने धर्मसेवेची संधी मिळेल. आणि शत्रू आम्हाला भित्रा समजू नयेत म्हणून तुम्ही आम्हाला मदिनेतून बाहेर काढा असा आग्रह धरला.

पैगंबरांनी तरुणांचे मत मान्य केले आणि ठरवले की आपण खुल्या मैदानात जाऊन काफिरांशी लढू आणि शुक्रवारच्या प्रार्थनेनंतर, पैगंबरांनी अल्लाहसाठी या लढाईत सहभागी होण्यासाठी मुस्लिमांमध्ये एक सामान्य प्रवचन दिले.

हुजूर अन्वर म्हणाले याविषयी बाकी तपशील पुढील प्रवचनात प्रस्तूत केली जाईल.

हुजूर अन्वर शेवटी म्हणाले की पॅलेस्टिनींसाठी प्रार्थना करत रहा, युद्धविराम संपल्यानंतर त्यांच्यावर गोळीबार केला जाईल आणि त्यानंतर निष्पाप लोक शहीद होतील. किती अन्याय होणार हे अल्लाहलाच माहीत आहे. त्यांच्या भवितव्याबद्दल महान शक्तींचे हेतू खूप धोकादायक आहेत. म्हणून, खूप प्रार्थनांची आवश्यकता आहे, अल्लाह त्यांच्यावर दया करो.आमीन

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهُ وَنَسْتَعِينُهُ وَنَسْتَغْفِرُهُ وَنُؤْمِنُ بِهِ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُورِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا
مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهُ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهُ وَنَشْهَدُ أَنْ لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ، عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰه
اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِى الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُونَ اُذْكُرُوا اللّٰهَ
يَذْكُرْكُمْ وَادْعُوهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ.